पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८, लेखा विभाग,
क्र. लेखा/०५/कावि/७४०३/२०१७
दिनांक :- २८/०८/२०१७

**विषय :- वस्तु व सेवा कर कायद्याच्या अंमलबजावणी पूर्वीची बीले अदायगीबाबत...**

**संदर्भ :- १. परिपत्रक क्र. लेखा /०५/कावि/८४७/१७ दि. ०१/०७/२०१७**
**२. मा. आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र. लेखा/०५/कावि/६३८५/२०१७ दि/ २५/०७/२०१७**
**३. परिपत्रक क्र. लेखा /०५/कावि/६६६३/१७ दि. ०२/०८/२०१७**
**४. परिपत्रक क्र. लेखा /०५/कावि/७०१९/१७ दि. १४/०८/२०१७**

**परिपत्रक,**

महसुली व भांडवली देयके जुन्या करपद्धतीनुसार लेखा विभागाकडे दि. १०/०७/२०१७ पर्यंत पाठविण्याबाबत संदर्भिय क्र. १ चे परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. तदनंतर संदर्भिय क्र. २ चे परिपत्रकान्वये आयुक्त यांचे स्वाक्षरीने याकामी दि. २९/०७/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. तसेच संदर्भिय क्र. ३ चे परिपत्रकान्वये याकामी दि. ०७/०८/२०१७ पर्यंत बिले सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आलेली होती. तदनंतर याप्रकरणी संबंधित विभागप्रमुखांची दि. १४/०८/२०१७ रोजी आयुक्त यांच्याकडे बैठक घेऊन संदर्भिय ४ अन्वये बिले सादर करण्याची अंतिम मुदत दि. १८/०८/२०१७ पर्यंत वाढविण्यात आलेली होती. तथापी अद्यापही त्या प्रमाणे कार्यवाही संबधित विभागप्रमुखांकडून झालेली नसून तदनंतरही लेखा विभागाकडे बिले पाठविण्यात येत आहेत.

तरी या प्रकरणी सर्व संबंधित विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, कोणत्याही परिस्थितीत त्यांनी जुन्या करपद्धतीनुसार बिले लेखा विभागाकडे दि. ३१/०८/२०१७ पर्यंत न चुकता सादर होतील याची दक्षता घ्यावी, तसेच तरतुदी अभावी जी देयके सादर करता येत नाहीत, त्यांची माहिती परिपत्रक क्र. लेखा /०५/कावि/७०१९/१७ दि. १४/०८/२०१७ मधील तक्त्यामध्ये लेखा विभागाकडे दि. ३१/०८/२०१७ पुर्वी सादर करावी अन्यथा लेखा विभागाने निदर्शनास आणल्यास संबंधित विभागप्रमुखांची एक वार्षिक वेतनवाढ थांबविण्याबाबतची कार्यवाही प्रशासन विभागाने प्रस्तावित करावी.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८

प्रति :- १) सर्व संबंधित विभागप्रमुख